# मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, मुंबई

(म्हाडाचा घटक)

**MUMBAI SLUM IMPROVEMENT BOARD MUMBAI**

(A MHADA UNIT)

म्हाडा

MHADA

जा.क्र.का.अ.(पश्चिम) मुं.झो.सु.म/ / २६
कार्यकारी अभियंता (पश्चिम) यांचे कार्यालय,
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०००५१.
दिनांक -

## जाहीर सुचना

मुंबई उपनगर जिल्हयातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना सोडत पध्दतीने मुंबई झोपडपटटी सुधार मंडळातील सोडतीच्या दिनांक पर्यंत उपलब्ध होणाऱ्या कामाचे वितरण करण्यासाठी दिनांक ०५/१०/२०२६ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत नियोजित सोडत कार्यक्रमासाठी गुलझारीलाल नंदा सभागृह, ३ रा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पु), मुंबई-४०० ०५१ येथे आयोजित सोडतीसाठी इच्छुक नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांनी उपस्थित रहावे.

**कार्यकारी अभियंता (पूर्व),**
**मुं.झो.सु.मंडळ, मुंबई**

**कार्यकारी अभियंता (पश्चिम),**
**मुं.झो.सु.मंडळ, मुंबई**

प्रत : मा. मुख्य अधिकारी/ मुं.झो.सु. मंडळ यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत : मा. उपमुख्य अभियंता/मुं.झो.सु. मंडळ यांना माहितीस्तव सविनय सादर.

# सोडतीचा कार्यक्रम

| अ.क्र. | टप्पा | विवरण / तपशील |
|---|---|---|
| १ | जाहिरात प्रसिद्धी दिनांक | दि. २९.०९.२०२६ |
| २ | पात्र नोंदणीकृत कंत्राटदार, सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता यांचे सोडतीसाठी अर्ज स्विकारण्याची दिनांक व वेळ | दि. ०५.१०.२०२६<br>सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वा. |
| ३ | सोडतीसाठी अर्ज स्विकारण्याचे ठिकाण | गुलझारीलाल नंदा सभागृह, ३ रा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पु), मुंबई-४०० ०५१ |
| ४ | अर्ज व कागदपत्रे यांची तांत्रिक तपासणी दिनांक व वेळ | दि. ०५.१०.२०२६ रोजी<br>दुपारी ३.०० वा. ठिकाण वरील ३ प्रमाणे. |
| ५ | सोडतीसाठी पात्र सुशिक्षित बेराजगार स्थापत्य अभियंता यांची यादी जाहीर करणे दिनांक व वेळ | दि. ०५.१०.२०२६ रोजी दुपारी ४.०० वा. |
| ६ | प्रत्यक्ष सोडत दिनांक व वेळ | दि. ०५.१०.२०२६ रोजी संध्याकाळी ४.०० वाजता |
| ७ | सोडतीचे ठिकाण | गुलझारीलाल नंदा सभागृह, ३ रा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पु), मुंबई-४०० ०५१ |
| ८ | सोडतीत यशस्वी झालेल्या अर्जदाराची कामासह यादी जाहीर करणे दिनांक व वेळ ठिकाण | दि. ०५.१०.२०२६ रोजी संध्याकाळी ५.३० वा. |

**अटी व शर्ती :-**

१) सदर सोडतीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यातील सदस्य असलेले सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता हे भाग घेऊ शकतील.

२) अर्जासोबत खालील नमुद कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकीत छाया प्रती जोडणे आवश्यक आहे.

अ) पॅनकार्डची छायांकित प्रत

ब) पंजीकरण (नोंदणी) प्रमाणपत्राची छायांकित प्रत.

क) जी.एस.टी प्रमाणपत्राची छायांकित प्रत.

ड) वर्क कार्ड ची छायांकित प्रत.

ई) मागील ३ वर्षाचे आयकर विवरण पत्र (ITR) किंवा पंजीकरण दिनांकापासूनचे उपलब्ध आयकर विवरण पत्राची (ITR) छायांकित पत्र.

३) कागदपत्रांच्या तांत्रिक तपासणी वेळी उपरोल्लोखीत कागदपत्रांच्या मुळ प्रती अर्जदाराने प्रत्यक्ष स्वत: उपस्थित राहून संबंधीत अधिकारी यांना पडताळणीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

४) पंजीकरण प्रमाणपत्रावर नमूद केलेल्या पत्त्याच्या शासकीय पूराव्याची छायांकित प्रत. (रेशन कार्ड वगळून)

५) कामाच्या प्रमाणात अर्ज प्राप्त न झाल्यास प्राप्त अर्जामधून सोडत काढण्यात येईल.

६) कोणतेही कारण न देता कोणताही अर्ज स्विकारणे वा नाकारणे वा सोडत रद्द करणे चा अधिकार कार्यकारी अभियंता (पूर्व ) व कार्यकारी अभियंता (पश्चिम ) /मुं.झो.सु.मंडळ यांनी राखून ठेवले आहे.

७) सोडतीत कोणतीही अडचण निर्माण झाल्यास अथवा कुठलाही आक्षेप आल्यास कार्यकारी अभियंता (पूर्व ) व कार्यकारी अभियंता (पश्चिम) / मुं.झो.सु. मंडळ यांचा निर्णय अंतिम राहील

**कार्यकारी अभियंता (पूर्व)**
**मुं.झो.सु.मंडळ, मुंबई**

**कार्यकारी अभियंता (पश्चिम)**
**मुं.झो.सु.मंडळ, मुंबई**